## ➢ शासनाची शैक्षणिक धोरणे योजना व कार्यक्रम –

- **स्वातंत्र्य अगोदरची धोरणे**
- **वॉरन हेस्टिंग्जने 1781 साली कलकत्त्याला एक मदरसा** स्थापन केला तेथे अरबी व फारशीचे अध्ययन केले जाऊ लागले.
- 1791 -बनारस संस्कृत महाविद्यालय- रेसिडेंट डंकन
- 1800 -फोर्ट विल्यम -कॉलेज लॉर्ड वेलस्ली
- 1813 च्या चार्टर कायद्यात भारतात शिक्षणाच्या प्रचारासाठी वार्षिक एक लक्ष रुपये संमत करण्यात आले

  उद्देश- भारतीय साहित्याची उन्नती व स्थानिक विद्वानांना प्रोत्साहन
- **लॉर्ड मेकॉले पद्धती 7 मार्च 1835** भविष्यात कंपनी सरकारने युरोपियन साहित्याच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावा व त्यासाठी माध्यम म्हणून इंग्रजीचा वापर करावा व त्यासाठी सर्व पैसा खर्च केला जावा शिक्षणाचा **झिरपता सिद्धांत यांनी** मांडला.

---

- **वुडचा अहवाल 1854 -**
- 1854 मध्ये भारतातील भावी शिक्षणासाठी एक विस्तृत योजना बनवून चार सोडणे अखिल भारतीय स्तरावर शिक्षणाच्या निर्देशन पद्धतीचे संघटन केले. ही ***पद्धती भारतीय शिक्षणाचा मॅग्ना कार्टा*** मानली जाते .
- पुढच्या धोरणातील महत्त्वपूर्ण शिफारसी सरकारच्या शिक्षण धोरणाचा उद्देश पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार करणे व युरोपियन ज्ञानाचा प्रसार करणे .उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी परंतु प्राथमिक शाळा मधून देशी भाषांत शिक्षण देण्याचे ठरविले. उद्देश देशी भाषेच्या माध्यमातून युरोपीय ज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचू शकेल .
- शिक्षण क्षेत्रात खाजगी प्रयत्नांना चालना देण्यासाठी अनुदान पद्धती कंपनीच्या पाच प्रांतात स्वतंत्र लोकशिक्षण विभाग **(1855)लंडन विद्यापीठाच्या आदर्श समोर ठेवून कलकत्ता मुंबई मद्रास येथे विद्यापीठांची सुरुवात.कलकत्ता, मुंबई ,मद्रास विद्यापीठ 1857 मध्ये अस्तित्वात आले.**

---

- **स्थानिक निधी समित्या- 1868**

1868 मध्ये लोकल फंड कमिट्यांची स्थापना होऊन लहान गावातील प्राथमिक शिक्षणाकडे सरकारने लक्ष पुरविले.

---

- **हंटर आयोग : 1882-83 (Hunter Education Commission) :**

1854 नंतर म्हणजे वूडच्या शिफारसी लागू केल्यानंतर शिक्षणाच्या प्रगतीचे निरीक्षण करण्याच्या उद्देशाने सरकारने 1882 मध्ये डब्ल्यू डब्ल्यू. हंटरच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना केली गेली. **हंटर आयोगाचे कार्यक्षेत्र प्राथमिक व माध्यमिक शिक्षण होते.** त्यात विद्यापीठांच्या कार्यक्षेत्राचा समावेश नव्हता.हंटर आयोगाने सर्वच प्रांतात दौरे काढून जवळजवळ 200 ठराव संमत केले.

**हंटर आयोगाच्या प्रमुख सुचना पुढीलप्रमाणे-**

1)प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेकडे व प्रगतीकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे. हे शिक्षण उपयुक्त विषयाचे असावे आणि त्यासाठी स्थानिक भाषांचा माध्यम म्हणून वापर व्हावा.

2)खाजगी प्रयत्नांचे स्वागत असावे पण त्याच्या अनुपस्थितीत प्राथमिक शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे.
3)प्राथमिक शाळांचे नियंत्रण नवीनच निर्माण झालेल्या जिल्हा व नगर मंडळाकडे दिले जावे. ही मंडळे खास शिक्षण कर लावू शकतात.
3)माध्यमिक शिक्षणाचे दोन प्रकार असावेत. एक विद्यापीठांच्या प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थी तयार करण्याकरिता साहित्य शिक्षण आणि दुसरा प्रकार म्हणजे व्यापारासाठी किंवा व्यवसायासाठी विद्यार्थी तयार करण्याकरिता दिले जाणारे व्यावहारिक शिक्षण.
4)शिक्षण क्षेत्रात खाजगी प्रयत्नांना पूर्ण चालना मिळावी. त्यादृष्टीने अनुदानाचे धोरण उदार करावे. तसेच अशा शाळांना सरकारी शाळांच्या बरोबरीचा दर्जा असावा.
5)सरकारने लवकरात लवकर माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणातून स्वतःला अलग करावे.
6)कलकत्ता, मुंबई व मद्रास ह्या प्रेसिडेंसी नगरांव्यक्तिरिक्त स्त्रियांसाठी शिक्षणाची पुरेशी व्यवस्था नसल्याबद्दल आयोगाने खेद व्यक्त करून तशी व्यवस्था करण्याची व स्त्री शिक्षणाला चालना देण्याची शिफारस केली.

---

- **भारतीय विद्यापीठ कायदा, 1904 (The Indian Universities Act)**

सप्टेंबर 1901 मध्ये कर्झनने सिमला येथे संपूर्ण भारतातील उच्च शिक्षण व विद्यापीठ अधिकाऱ्यांचे एक संमेलन बोलविले. **त्यानंतर थॉमस रॅलेच्या अध्यक्षतेखाली एक आयोग** नियुक्त करण्यात आला. विद्यापीठाच्या स्थितीचा आढावा घेऊन त्यांच्या संरचनेबाबत व कार्यक्षमतेसंबंधी सूचना करणे आयोगाचे काम होते.त्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्राचा अंतर्भाव नव्हता. त्यानुसार 1904 साली भारतीय विद्यापीठ कायदा (The Indian Universities Act) संमत करण्यात आला,

**त्यात खालील बदल सुचविले होते :-**

1)विद्यापीठांनी अध्ययन कार्यासाठी व संशोधनासाठी प्राध्यापकांच्या व व्याख्यात्यांच्या नियुक्तीची व्यवस्था करावी,
2)प्रयोगशाळा व ग्रंथालयांची निर्मिती करावी तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी उचलावी,
3 )विद्यापीठ सदस्यांची संख्या 50 पेक्षा कमी आणि 100 पेक्षा जास्त असू नये. हे सदस्य आजीवन न रहाता सहा वर्षांसाठी असावे, सदस्य प्रामुख्याने सरकारव्दारा नामनियुक्त असावे.

---

- **सॅडलर विद्यापठ आयोग - 1917-19**(Sadlar University Commission) :

1917 मध्ये सरकारने किलकत्ता विद्यापीठाच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर अहवाल देण्यासाठी एक आयोग नियुक्त केला. **लीडस् विद्यापीठाचे कुलगुरू एम.इ. सॅडलर यांना आयोगाचे अध्यक्ष नियुक्त करण्यात आले. आयोगाच्या सदस्यामध्ये|आशुतोष मुखर्जी आणि झियाउद्दीन अहमद हे भारतीय होते**

1) उत्तर माध्यमिक स्तरानंतर स्नातक पदवी (Bachelors Degree) मिळवण्यासाठी तीन वर्षाचे शिक्षण असावे.
2)अधिक प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांसाठी प्राविण्य अभ्यासक्रम असावा आणि तो सर्वसाधारण अभ्यासक्रमापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असावा.
3)विद्यापीठांसाठी नियम तयार करताना शिथिलता असावी.
4)कलकत्ता विद्यापीठाचा भार हलका करण्यासाठी ढाका येथे एक केंद्रीय विद्यापीठ स्थापन केले जावे आणि इतरही विद्यापीठांमध्ये अशी व्यवस्था केली जावी.
5)महिलामध्ये शिक्षणाचा प्रसार होण्याकरिता असलेल्या सवलतीचा विस्तार केला जावा आणि कलकत्ता विद्यापीठात महिला शिक्षणासाठी एक मंडळ तयार केले जावे.
6)अध्यापकांना प्रशिक्षण देण्यासाठी खूप सवलती दिल्या जाव्या व त्यादृष्टीने कलकत्ता व ढाका विद्यापीठात 'शिक्षण विभाग' स्थापन केला जावा.

7)विद्यापीठांना अशी सूचना करण्यात आली की, त्यांनी आयोजित विज्ञान (Applied Science) व स्नातक पदवी (degree) देण्याचा प्रबंध करावा. त्यादृष्टीने विद्यापीठांनी व्यावसायिक महाविद्यालये (Professional and Vocational Colleges) उघडून त्यातील अध्यापकांना प्रशिक्षण देण्याची सोय करावी.1916 आणि 1921 च्या दरम्यान म्हैसूर, पटना, बनारस, अलीगड, ढाका, लखनौ आणि उस्मानिया अशी सात नवी विद्यापीठे अस्तित्वात आली.

---

- **मूळ शिक्षणाची वर्धा योजना**(Waradha Scheme of Basic Education):
- विद्यापीठांनी शिक्षण सुधारणेकडे लक्ष द्यावे आणि फक्त त्या फक्त आपले लक्ष केंद्रीत करावे तसेच योग्य विद्यार्थ्यांना चांगले उच्च शिक्षण मिळेल याची काळजी घ्यावी.
- **1937 मध्ये महात्मा गांधींनी 'हरीजन' वृत्तपत्रातून एक लेखमाला प्रकाशित केली व शिक्षण योजनेची चर्चा केली त्याला 'मौलिक आधारभूत शिक्षण' (Basic Education) किंवा 'वर्धा योजना' नाव देण्यात आले**.या योजनेचे तत्त्व काम करताना शिक्षण' हे होते.
- ही योजना सविस्तररित्या **झाकीर हुसेन समितीने** पुढे आणली अनेक कलांसाठी अभ्यासक्रम तयार केले. हस्त उत्पादक कार्य (Manual Productive Work) करताना त्यातूनच शिक्षकाचे वेतन निघावे अशी मूळ कल्पना होती. **विद्यार्थ्यांना मातृभाषेतून 7 वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होती.**

---

- **सार्जंट योजना - 1944 (Sargeant Plan of Education):**

- 1944 मध्ये केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने (Central Advisory Board of Education) राष्ट्रीय शिक्षणाची एक योजना तयार केली जिला सार्जंट योजना असे म्हणतात.
- जॉन सार्जंट भारत सरकारचे शिक्षणविषयक सल्लागार होते.योजनेनुसार देशात प्रारंभिक विद्यालये (Elementary Schoolमाध्यमिक विद्यालये (High Schools) ज्यात कनिष्ठ व आधार विद्यालये (Junior and Senior Basic Schools) स्थापन करावयाची होती.
- सहा ते अकरा वर्षाच्या बालकांना मोठ्या प्रमाणावर निःशुल्कअनिवार्य शिक्षण देण्याची तरतूद होती.अकरा ते सतरा वर्षाच्या मुलांसाठी सहा वर्षाची वेगळी शिक्षण पध्दत होती. उच्च विद्यालये दोन प्रकारची राहणार होती.
- विद्याविषयक आणि तंत्र व्यावसायिक (Technical and Vocational) स्वरूपाची. त्यांचे अभ्यासक्रम वेगळे राहणारे होते.या योजनेनुसार 40 वर्षात देशात शिक्षण पुनर्निर्माणाचे कार्य पूर्ण करावयाचे होते.
 खेर समितीने हा कालावधी कमी करून सोळा वर्षे केला.

---

---

➢ **स्वातंत्र्यानंतरची शिक्षण धोरणे**(Policies After Independence)

- **विद्यापीठ शिक्षण आयोग / राधाकृष्णन आयोग 1948:**

**(University Educaiton Commission/ Radhakrishnan Commission):**

- केंद्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळ (Central Advisory Board of Education) आणि आंतरमहाविद्यालयीन मंडळ (Inter-University Board of education) यांच्या शिफारसीवरून **नोव्हेंबर 1948 साली डॉ.**

**सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याअध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोग** (University Education Commission) स्थापन करण्यात आला.

- आयोगाने आपला अहवाल ऑगस्ट 1949 रोजी सादर केला. स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेल्या या आयोगाला शिक्षणक्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे प्रतिष्ठित विद्वान तसेच बनारस हिंदू विद्यापीठाचे माजी कुलगुरू (Vice Chancellor) होते.'
- **विद्यापीठ शिक्षणासंबंधी अहवाल** देऊन त्यात सुधारणा सुचविणे,तसेच विस्तार घडवून आणण्यासाठी शिफारसी करावयाच्या होत्या". या आयोगातील सदस्यांची संख्या दहा होती.

---

- **माध्यमिक शिक्षण आयोग/ मुदलियार आयोग 1952-53**

**(Secondary Education Commission/Mudaliyar Commission) :**

माध्यमिक शिक्षण हा आपल्या शैक्षणिक यंत्रणेतील कमजोर दुवा राहिलेला आहे, असा शेरा 'विद्यापीठ शिक्षण आयोगाने' दिला आणि त्यात तात्काळ सुधारणा करावी अशी शिफारस केली. केंद्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळाच्या (Central Advisory Board of Education) चौदाव्या बैठकीतील शिफारसीनुसार, **भारत सरकारने 23 सप्टेंबर 1952 रोजी डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना केली.आयोगाने आपला अहवाल जून 1953 साली सादर केला. डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलीयार हे मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्यरत होते.**

---

- **शिक्षण आयोग/कोठारी आयोग: 1964-**

**(Education Commission / Kothari Commission) :**

- विद्यापीठ शिक्षण आयोग तसेय माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारसी पूर्णपणे लागू न झाल्यामुळे शिक्षण क्षेत्रात काही त्रुटी होत्या. या त्रुटी दूर करण्यासाठी, शिक्षणाचा राष्ट्रीय नमुना तयार करणे त्याचबरोबर शिक्षणासाठीची साधारण तत्वे, शिक्षणाच्या संपूर्ण स्तरावरील विकासासाठी धोरण तयार करणे याबाबत सरकारला सल्ला देण्यासाठी नव्या शिक्षण आयोगाची नियुक्ती सरकारने केली.
- भारत सरकारने एका ठरावाव्दारे **14 जुलै 1964 रोजी या आयोगाची स्थापना** केली.
- आयोगातील सदस्यांमध्ये भारतातील तसेच विदेशातील विविध क्षेत्रातील नामवंत शिक्षणतज्ञ होते.**आयोगातील सदस्यांची एकूण संख्या सतरा होती**. त्यापैकी चौदासदस्य, एक सदस्यसचिव, एक सहसचिव आणि आयोगाचे **अध्यक्ष म्हणून डॉ.डी.स. कोठारी (विद्यापीठ अनुदान आयोगाचे (UGC) तत्कालीन अध्यक्ष)** होते.
- **"देशाचे भवितव्य हे वर्गावर्गातून घडत असते"-डॉ. डी. एस. कोठारी,**
- आयोगातील सदस्यांपैकी पाच सदस्य हे इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जपान आणि रशिया या देशांतील होते
- **सदस्य सचिव म्हणून जे.पी. नाईक यांची नेमणूक करण्यात आली.**

  **सहसचिव म्हणून जे.एफ. मॅकड्युगल (J.F. McDougall) यांची नेमणुक करण्यात आली.**
- आयोगाने आपला अहवाल 29 जून 1966 रोजी सादर केला.

**आयोगाची खास वैशिष्ट्ये :-**

या अगोदरच्या आयोगानी शिक्षणाच्या विविध स्तरावर लक्ष केल केले होते, मात्र शिक्षण आयोगाने (Education Commission संपूर्ण शैक्षणिक प्रणालीचा एकत्र आढावा घेतला.

**शिक्षण हे राष्ट्रीय विकासाचे शक्तिशाली साधन आहे,आयोगाची खात्री होती**. आयोगातील आंतरराष्ट्रीय रचना महत्त्वपूर्ण होती. एकूण सदस्यांपैकी पाच सदस्य विदेशातील होते, तर विविध देशातील वीस सल्लागार उपलब्ध होते.

**आयोगाचा अहवाल** :-

**शिक्षण आणि राष्ट्रीय ध्येय या शीर्षकाने आयोगाने आपला अहवाल सादर केला.**

सदर अहवाल चार विभागांमध्ये विभाजित होता.आयोगाने आपल्या कार्याची सुरुवात 2 ऑक्टोबर 1964 रोजी सुरु केली.आयोगाचे कामकाज 100 दिवस चालले.

**आयोगाच्या शिक्षण व राष्ट्रीय उद्दिष्टे याबद्दल शिफारसी :-**

1)उत्पादन क्षमतात वाढ.

2)शिक्षण हे राष्ट्रीय उत्पन्नवाढीचे प्रमुख साधन आहे...

3)विज्ञान विषय हा शिक्षण आणि संस्कृतीतील मुलभूत घटक (Basic component) आहे म्हणून तो शिक्षणाचा अविभाज्य भाग असावा,

4)अंग मेहनतीच्या (Manual work) कामाचे मूल्य मनावर बिंबण्यासाठी शालेय शिक्षणात कार्यानुभवाचा (Work experience) समावेश करावा.

5)उद्योग, कृषी आणि व्यापार यांच्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांची गरज भागवण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात व्यावसायिक विषयाचा समावेश करावा.

6)व्यावसायिकीकरणामुळे शिक्षण आणि उत्पादकता याच्यात जवळचे संबंध तयार होतील, असे मत व्यक्त केले.

7)सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता प्रोत्साहन :-शिक्षित व अशिक्षितांमधील तफावत भरून काढणे, सामाजिक आणि राष्ट्रीय सेवा या शालेय शिक्षणाचा अविभाज्य भाग असतील.मातृभाषा, हिंदी आणि आधुनिक भारतीय भाषांमधील शिक्षण,घेण्यासाठी तरतुदी कराव्यात.

8)विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, नैतिक व अध्यात्मिक मुल्ये जपली जावीत यासाठी राष्ट्रीय शिक्षण व्यवस्था असावी, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र व राज्य शासनांनी सदर मूल्ये रुजवावीत

**इतर शिफारसी :-**

महाविद्यालये सुरु करावीत.

शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.

विद्यापीठांच्या संख्येत वाढ करून ठराविक महाविद्यालयांना

स्वायत्तता द्यावी.

विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी अंशकालीन प्रौढ

साक्षरता वर्ग सुरू करावेत

त्रिभाषा सूत्राचा वापर करावा.

मातृभाषेतून शालेय शिक्षण उपलब्ध असावे.

आश्रम शाळात वाढ करावी.

स्त्री विभाग स्वतंत्र असावेत.

पदवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण व पदव्युत्तर शिक्षण इंग्रजीतून द्यावे.

शिक्षक वेतनश्रेणीत सर्वत्र समानता असावी.

प्राथमिक शाळेत 'पुस्तके व साहित्य मोफत पुस्तकपेढी योजना'सुरू करावी.

'श्रमशिबिर' व 'समाजसेवा कार्यक्रम सुरू करून, बालकांचा विकास साधावा.
आदिवासी मुलांसाठी वसतिगृह सुरू करावे.
विद्यार्थीकल्याण योजना राबवावी.
सर्व स्तरावर विज्ञान विषयाला महत्त्व द्यावे.
विद्यार्थी संख्या विचारात घेऊन वर्गखोल्या असाव्यात.
समाजाच्या गरजेनुसार पाठ्यक्रम असावा, त्यानुसार पाठ्यपुस्तक तयार करावीत.
प्राथमिक शाळा एक किलोमीटरच्या परिसरात असावी.

---

- **राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 -**

**(National Education Policy 1968)**

- कोठारी आयोगाच्या (Kothari Commission), शिफारसीवर आधारीत शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण (National Policy of Education) 1968 साली जाहीर झाले.
- **राष्ट्रीय एकात्मता आणि समाजवादाचा आदर्श लक्षात** घेऊन देशाचा आर्थिक आणि सांस्कृतिक विकास करण्यासाठी शिक्षण आयोगाने सुचविलेल्या शिफारसीला अनुसरून शिक्षणाची तात्काळ पुनर्रचना करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 घोषित करण्यात आले.
- **सदर शैक्षणिक धोरण हे स्वतंत्र भारताचे पहिलेच शिक्षणविषय धोरण होते.डॉ. त्रिगुणा सेन यांच्या अध्यक्षतेखाली या धोरणाचा मसुदा तयार. करण्यात आला.**

---

- **राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986**

**(National Education Policy-1986):**

राजीव गांधी पंतप्रधान असताना 1985 सालच्या अंदाजपत्रकात (Budget) शिक्षणावर आढावा घेण्यात आला तसेच चर्चा घडून आली त्याचा परिणाम म्हणून 1986 साली राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर करण्यात आले.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 ची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे -**

**1)प्राथमिक शिक्षणासंदर्भात (Related to Elementory Education): वैश्विक पोहोच आणि नोंदणी**, (Universal access &Enrolment) चौदा वर्षे वयापर्यंतच्या मुलांची वैश्विक धारणा प्राप्त करणे(Universal retention100%)सर्व मुलांना शिक्षणाचा आवश्यक स्तर प्राप्त करावा यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणामध्ये शाश्वत सुधारणा करावी.

2 )माध्यमिक शिक्षणासंदर्भात(Related to Secondary Education):
माध्यमिक शिक्षणात संगणक साक्षरता उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून विद्यार्थी आवश्यक संगणक कौशल्ये प्राप्त करतील.

3) उच्च शिक्षणासंदर्भात (Related to higher education):
उच्च शिक्षणाव्दारे लोकांना अध्यात्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, नैतिक बाबीवर मत व्यक्त करण्याची क्षमता उपलब्ध करून देणे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 च्या तरतुदी:**

**बालपणातील काळजी आणि शिक्षण.**(Early childhood care and evaluation):एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS-Integrated child development service), बालवाडी, नगरपालिका आणि घटकराज्याव्दारे दिले जाणारे पूर्वप्राथमिक शिक्षण, पाळणाघरे (day care centre), शिक्षक प्रशिक्षण संस्था (training institute of teachers), अस्तित्वात असलेली पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुविधा यांचे बळकटीकरण करावे. तसेच यावर सरकारव्दारा जास्तीचे लक्ष असावे.

**प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण आणि खडू फळा मोहीम**

(Elementary Education, non formal Education and operation Blackboard) :

प्राथमिक शिक्षणात चौदा वर्षे वयापर्यंत वैश्विक नोंदणी (Universal Enrolment) आणि वैश्विक धारणा (Universal retention)यावर भर देण्यात यावा. तसेच शिक्षणाच्या गुणवत्तेत शाश्वत सुधारणा राखणे.

शाळामध्ये मुलभूत सुविधा प्राप्त होण्यासाठी खड्डू फळा मोहीम सुरू करण्यात यावी.

अनौपचारिक शिक्षणातील शिक्षणाच्या वातावरणात सुधारणा होण्यासाठी, अनौपचारिक शिक्षण केंद्रावर सौर संच (Solar pack) उपलब्धकरून देणे. तसेच दृक-श्राव्य (audio-visual aids), रेडिओ कॅसेट प्लेअर (radio-cassette "players") या आधुनिक तंत्रज्ञानाचा (technological equipment) वापर करणे.

**माध्यमिक शिक्षण आणि नवोदय विद्यालये**

(Secondary Education and Navodaya Vidyalayas):

माध्यमिक शिक्षणाची पोहोच (access) वाढावी.नवीन नवोदय विद्यालयाची स्थापना करावी. माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी गट हे एकक मानून अधिवासापासून कमीत कमी अंतरावर शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्यांनी प्रोत्साहन द्यावे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा (1986) आढावा घेण्यासाठी तसेच त्यामध्ये फेरबदल करण्यासंदर्भात शिफारसी करण्यासाठी मे, 1990 मध्ये आचार्य राममूती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली**

केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने (CABE-Central Advisory Board on Education) जुलै 1991 मध्ये श्री. जनार्दन रेखा (आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री) यांच्या अध्यक्षतेखाली नवे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यासाठी समिती नेमली. या समितीने आपला अहवाल जानेवारी 1992 मध्ये सादर केला. या अहवालास 1992 चा राष्ट्रीय कृती आराखडा' (National Programme of Action, 1992) असे म्हणतात.

---

**संसदेत 93वी घटनादरूस्ती विधेयक, 2001**

- Constitutional Ammendment Bill, 2001) अधिसूचित केले. **त्याव्दारे 86वी घटनादुरूस्ती कायदा 2002 .Constitutional Act 2002** पारीत करून तो लागू करण्यात आला.त्याव्दारे-शासन सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि शिक्षण उपलब्ध करून देईल यासाठी घटनेत **कलम 21A** हक्काचा समावेश करण्यात आला.
- घटनेच्या भाग IV मधील **कलम 45** मध्ये पुढीलप्रमाणे करण्यात आला. **शासन हे मुलांचे सहा वर्ष वय होईपर्यंत त्याच्या संगोपनास शिक्षणासाठी प्रयत्न करेल.**

- घटनेच्या **भाग IV-A मधील कलम 51A** मध्ये एका नवीन मुलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला ते पुढीलप्रमाणे **"जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या पाल्यास क्याच्या सहा ते चौदा वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.**

---

- **यशपाल समिती (Yashpal Committee-2009):**

- यशपाल समितीची **स्थापना 28 फेब्रुवारी 2008** रोजी करण्यात आली.
- या समिती स्थापनेमागचा **उद्देश हा विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) आणि उच्च शिक्षणाशी संबंधित इतर परिषदांचे समीक्षण** करणे हा होता.
- 1 मार्च 2009 रोजी यशपाल समितीने उच शिक्षण संस्थाचे पुनरुज्जीवन आणि सक्षमीकरण करण्यासाठी सल्ला देणारा अहवाल दिला.

**सद्यस्थितीतील उच्च शिक्षणामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यासाठी समितीने पुढील शिफारसी केल्या.**

- UGC, AICTE, NCTE आणि DES यांसारख्या सर्व नियामक संस्थांना अंतर्भूत करून राष्ट्रीय उच्च शिक्षण आणि संशोधन आयोगाची (NCHER- National Commission on Higher Education and Research) निर्मिती करणे व त्यास घटनात्मक दर्जा देणे.

---

- **Right to Education Act 2009 -**

- भारतीय संविधानाच्या कलम 21-अ अंतर्गत सहा ते चौदा वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध करण्याची तरतूद, बालकांसाठीच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षण अधिनियमात सविस्तर केली आहे.
- ***1 एप्रिल 2010 रोजी हा कायदा भारतात अस्तित्वात आला आणि शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क असल्याचे मान्य करणाऱ्या 135 देशाच्या यादीत भारताला स्थान लाभले.***
- हा अधिनियम, सहा ते चौदा वर्षे वयोगटातील बालकांसाठी शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे मान्य करण्याबरोबरच प्राथमिक शाळेसाठीच्या किमान अटीही निर्धारित करतो.
- सर्व खाजगी शाळांमध्ये गरीब कुटुंबातील बालकांसाठी 25% जागा आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे (खाजगी-सार्वजनिक भागीदारीनुसार राज्याकडून नुकसान भरपाई प्राप्त) सर्व बिगरमान्यताप्राप्त शाळांमध्ये प्रवेशासाठी बालक अथवापालकाची मुलाखत, डोनेशन किंवा दरडोई शुल्क (Capitation) शुल्काची तरतुद करण्यास अथवा अशा प्रकारचे शुल्क आकारण्यास मनाई.
- शाळेतून गळती झालेल्या बालकांना त्यांच्या समवयस्क विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण देण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची तरतूद.
- परिसरात देखरेख करणे, शिक्षणाची आवश्यकता असणारी बालके हेरणे तसेच त्यांना आवश्यक त्या सुविधा देण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्याची तरतुद
- शालेय प्राथमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा शालेय प्रवेश, उपस्थिती आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे याची जबाबदारी शासनाकडे सोपवणारा हा जगातला अशा प्रकारचा पहिलाच अधिनियम आहे इतर देशांमध्ये ही जबाबदारी पालकांवर सोपवली जाते.

- **बाराव्या पंचवार्षिक योजनेवरील शिक्षणसंबंधित तरतुदी(2012-2017): (Education Related Recommendation of XII Five Year Plan):**

1)साक्षरता दर 80% पर्यंत करणे.

2)साक्षरतेतील लिंगतफावत (gender gap) 10% पेक्षा कमी करणे

उपस्थितीत सुधारणा करणे, तसेच शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर गळतीचा दर (dropout rate) 10% पेक्षा कमी करणे.

3) प्राथमिक स्तरावर शाळाबाह्य (out of school) मुलांचे प्रमाण 10% पेक्षा कमी करणे.

4)निम्न माध्यमिक स्तरावर ढोबळ नोंदणी दराचे (gross enrollment ratio) चे प्रमाणे 90% करणे.

5)उच्च माध्यमिक स्तरावर ढोबळ नोंदणी दराचे (GER-Gross Enrollment ratio) चे प्रमाण 65% करणे.

6)प्राथमिक शाळामध्ये मुख्यतः शैक्षणिकदृष्टया मागास गटामध्ये (Educationally Backward Block) किमान एका वर्षासाठी योग्य संसाधनयुक्त पूर्व प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून द्यावे

---

- **भारताच्या घटनेची ठळक वैशिष्ट्ये -**

**(Outstanding features of the Constitution)**

भारताच्या घटनेची महत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील:-

**१)सर्वात मोठी लिखित घटना (Longest known written constitition)**

भारताची घटना ही प्रामुख्याने एक लिखित घटना आहे. लिखित घटना एका विशिष्ट वेळी तयार केली जाते व एक दस्तदेवज (document) म्हणून ती एका निश्चित तारखेपासून अधिनियमित केली जाते किंवा अंमलात येते. तसेच भारताची घटना जगातील सर्व लिखित घटनांपैकी सर्वात मोठी घटना आहे. ती एक खूप सर्वसमावेशक, विस्तृत व तपशीलवार दस्तऐवज आहे. **१९४९ च्या मूळ घटनेत एक प्रास्ताविका, २२ भाग, ३९५ कलमे आणि ८ अनुसूची** होत्या.मात्र १९५१ नंतर अनेक घटनादुरूस्त्या झाल्या. भाग VII वगळण्यात आला, तर भाग IVA (मूलभूत कर्तव्ये), IX A (नगरपालिका), IX B (सहकारी सोसायट्या) आणि XIVA (न्यायाधिकरणे) हे भाग, आणि चार अनुसूची (IX,X. XI, XII) नंतर समाविष्ट करण्यात आल्या. घटनादुरूस्त्यांद्वारे घटनेत नवीन कलमे टाकण्यात आली, तर काही कलमे वगळण्यात आली.

**२)विविध स्तोतांपासून तयार करण्यात आलेली घटना(Drawn from different sources)**

सुमारे ६० देशांच्या घटनांचा विचार घेऊन त्यांतून महत्वाच्या तरतुदी भारताच्या घटनेत समाविष्ट करण्यात आल्या. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी मत व्यक्त केले की, भारताची घटना जगातील सर्वज्ञात घटना धुंडाळून तयार करण्यात आलेली आहे. **घटनेचा संरचनात्मक भाग (structural part) मोठ्या प्रमाणात भारतीय शासनाचा कायदा, १९३५ वर आधारित** आहे. या कायद्यातील सुमारे २५० तरतुदी घटनेत घेण्यात आलेल्या आहेत.

ii)घटनेचा तात्विक भाग (philosophical part), विशेषत: मूलभूत हक व मार्गदर्शक तत्वे अनुक्रमे अमेरिकन व आयरिश घटनांवर आधारित आहेत.

(iii) घटनेचा राजकीय भाग (political part), ज्यामध्ये संसदीय शासनव्यवस्थेच्या तत्वांचा समावेश होतो. ब्रिटनच्या घटनेवर आधारलेला आहे.

घटनेतील इतर तरतुदी कॅनडा, जर्मनी, सोव्हिएत रशिया,ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, जपान, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांच्या घटनेवरून घेण्यात आल्या आहेत.

- **भारताच्या घटनेतील विविध तरतुदींचे महत्वाचे स्रोत पुढीलप्रमाणे:-**

I) भारतीय शासन कायदा, १९३५ :संघराज्यीय योजना, न्यायव्यवस्था, लोक सेवा आयोग, आणीबाणीच्या तरतुदी, राज्यपालाचे पद, प्रशासकीय तपशील.

ii)ब्रिटिश घटना:संसदीय शासन व्यवस्था, कॅबिनेट व्यवस्था, द्विगृही संसद,
फर्स्ट- पास्ट पोस्ट-सिस्टिम, कायदा करण्याची पद्धत, कायद्याचे राज्य, एकच नागरिकत्व, संसदीय विशेषाधिकार.

iii) युएसए ची घटना:मूलभूत हक, उपराष्ट्रपती हे पद, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य,न्यायिक पुनर्विलोकन, राष्ट्रपतींवरील महाभियोगाची पद्धत, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशास पदावरून दूर करण्याची पद्धत.

iv) कॅनडाची घटना: प्रभावी केंद्र असलेले संघराज्य शेषाधिकार केंद्राकडे असण्याची
तरतूद राज्यपालाची केंद्राचा प्रतिनिधी म्हणून नेमणूक न्यायालयाचे सागार अधिकारक्षेत्र

v)आयरिश घटना:राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे ,पद्धत राज्यसभेतील सदस्यांचे नामनिर्देशन

vi) ऑस्ट्रेलियाची घटनाःसमवर्ती सूची, संसदेच्या व वाणिज्याचे स्वातंत्र्य

vil) फ्रान्सची घटना: गणराज्य प्रास्ताविकेतील स्वातंत्र्य, समतावबंधुता आदर्श

vill) दक्षिण आफ्रिकेची घटना:घटनादुरुस्तीची पद्धत, राज्यसभेच्या सदस्यांची

ix) सोव्हिएत रशियाची घटना:मूलभूत कर्तव्ये, प्रास्ताविकेतील सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचा आदर्श

x)जपानची घटना: कायद्याने प्रस्थापित पद्धत.

xi) जर्मनीची घटना (वेइमर घटना): आणीबाणीदरम्यान मूलभूत हक स्थगित होणे.

### ३) संघराज्यीय राजव्यवस्था (Federal polity)

भारताच्या घटनेने संपराज्यीय शासन व्यवस्था निर्माण केली आहे. संपराज्याची (federation) नेहमीची अनेक वैशिष्ट्ये तिच्यात आढळतात. उदा. केंद्र व राज्य सरकारांचे अस्तित्व, त्यांच्यामध्ये अधिकारांची विभागणी लिखित घटना व घटनेची सर्वोच्चता, घटनेची ताठरता, स्वतंत्र न्यायव्यवस्था द्विगृही कायदेमंडळाचे अस्तित्व मात्र, त्याचबरोबर भारतीय घटनेत अनेक एकात्मक गैर-संघात्मक वैशिष्ट्येही आढळतात. उदा. प्रभावी/अधिकारपत्र केंद्रशासन, एकच घटना, एकेरी नागरिकत्व, घटनेची लवचिकता, एकात्मिक न्यायव्यवस्था केंद्राद्वारे राज्यपालाची नेमणूक, अखिल भारतीय सेवा, आणीबाणीविषयक तरतुदी इत्यादी.

### ४) संसदीय शासनपद्धती (Parliamentary form of govemment)

भारताने अमेरिकन अध्यक्षीय शासनव्यवस्थेच्या ऐवजी ब्रिटनप्रमाणे संसदीय शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे.अध्यक्षीय शासनव्यवस्थेत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ परस्परांपासून पूर्णपणे विभक्त केलेले असतात. मात्र, संसदीय शासनव्यवस्था त्यांच्यातील सहकार्य व समन्वयाच्या तत्वावर आधारलेली असते.

### ५) ताठरता व लवचिकता यांचे एकत्रिकरण (Combination of Rigidity and Flexibility)

भारताची घटना ताठरता व लवचिकतेच्या एकत्रिकरणाचे उत्तम उदाहरण आहे. घटनेची ताठरता किंवा लवचिकता घटनादुरूस्तीच्या पद्धतींच्या आधारावर ठरते. ताठर घटनेची घटनादुरूस्ती पद्धत अवघड असते, उदा. युएसए, स्वित्झर्लंड,ऑस्ट्रेलिया इत्यादी. याउलट लवचिक घटनेची घटनादुरूस्ती पद्धत सोपी व साधी असते, उदा. ब्रिटनची घटना. भारताच्या घटनेत बदल करण्याच्या पद्धतींमध्ये ताठर तसेच लवचिक अशा दोन्ही पद्धतींचा समावेश होतो. घटनादुरूस्तीची पद्धत कलम ३६८ मध्ये देण्यात आली आहे.

### ६) संसदीय सार्वभौमत्व व न्यायिक सर्वोच्चता यांचे संतुलन (Balance between Parliamentary Sovereignty and Judicial Supremacy)

भारताच्या घटनेत कायदेमंडळ व न्यायमंडळ यांच्या अधिकारांत योग्य संतुलन निर्माण करण्यात आले आहे. म्हणजेच, ब्रिटिश घटनेतील 'संसदेच्या सार्वभौमत्वाचे तत्व' आणि अमेरिकन घटनेतील 'न्यायीक सर्वोच्चतेचे तत्व', यांमध्ये योग्य संतुलन निर्माण करण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे साध्य करण्यात आले आहे:-

संसदेला कायदे करण्याचे तसेच घटनादुरुस्ती करण्याचे अधिकार आहेत. तेवढ्या प्रमाणात संसद सार्वभौम आहे. मात्र संसदेने केलेले कायदे/घटनादुरूस्त्या घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन करतात म्हणून बाद ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना आहे. तेवढ्या प्रमाणात न्यायव्यवस्था सर्वोच्च आहे. म्हणजेच, भारतीय संसद पूर्णपणे सार्वभौम नाही, तर सर्वोच्च न्यायालय पूर्णपणे सर्वोत्त्च नाही, तर दोघांच्या अधिकारांमध्ये पर्याप्त संतुलन निर्माण करण्यात आले आहे. हे संतुलन आज केशवानंद भारती खटल्याद्वारे (१९७३) व्यवस्थितपणे प्रस्थापित झाले आहे.

### ७) स्वतंत्र व एकात्मिक न्यायव्यवस्था (Independent and Integrated Judiciary)

भारताच्या घटनेने कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांबाबतीत जरी संघराज्यीय व्यवस्था निर्माण केलेली असली तरी न्यायव्यवस्था एकेरी व एकात्मिक बनविण्यात आली आहे. अशा एकात्मिक न्यायव्यवस्थेच्या शिखर स्तरावर सर्वोच्च न्यायालय, राज्य स्तरावर उच्च न्यायालये, तर त्याखालील स्तरावर कनिष्ठ न्यायव्यवस्थेची श्रृंखला आहे. या एकेरी व्यवस्थेत केंद्रीय कायदे तसेच राज्य कायदे असे दोन्ही प्रकारचे कायदे बजावले/अंमलात आणले जातात. (अमेरिकेत संघराज्यीय न्यायव्यवस्थेद्वारे संघराज्यीय कायदे, तर राज्य न्यायव्यवस्थेद्वारे राज्य कायदे अंमलात आणले जातात.)

### ८)मूलभूत हक्क (Fundamental Rights)

प्रत्येक व्यक्तीला चांगले जीवन जगता यावे यासाठी काही विशिष्ट हक्क उपलब्ध असण्याचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये असे हक्क सर्वांना समानपणे प्राप्त होतात. भारताची घटना असे हक्क मूलभूत हक्कांच्या स्वरूपात उपलब्ध करून देते. मूलभूत हक्कांचा समावेश, हे भारताच्या घटनेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. (त्यांची माहिती संबंधित प्रकारणात दिलेली आहे.) हे मूलभूत हक्क न्यायप्रविष्ट (justiciable) असल्याने त्यांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयांकडून (सर्वोच्च तसेच उच्च) ते पुन्हा प्राप्त करून घेता येतात. हे हक्क नागरिकांना मुख्यत: शासनसंस्थेविरूद्ध उपलब्ध आहेत. त्यामुळे हे मूलभूत हक्क देशात राजकीय लोकशाहीच्या संकल्पनेची पूर्तता करण्याचे कार्य करतात. अर्थात, नागरिकांना प्राप्त असलेले मूलभूत हक्क अमर्यादित नसून त्यांच्यावर पर्याप्त बंधने (reasonable restrictions) घालण्यात आलेली आहेत. तसेच संसद घटनादुरुस्तीद्वारे त्यांच्यात बदल करू शकते. तसेच कलम २० व २१ मधील हक्क वगळता इतर हक्क राष्ट्रीय आणीबाणीदरम्यान स्थगित करता येतात.

### ९) राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (Directive Principles of State Policy)

आयरिश घटनेवरून घेण्यात आलेली राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे भारताच्या घटनेतील एक अद्वितीय वैशिष्ट्य आहेत. डॉ.आंबेडकर यांच्या मते, ही तत्वे घटनेचे 'नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य'आहे. ही तत्वे भारतात कल्याणकारी राज्याची निर्मिती करून लोकांना सामाजिक-आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी समाविष्ट करण्यात आलेली आहेत. ही मार्गदर्शक तत्वे मात्र न्यायप्रविष्ट नाहीत. सरकारने त्यांचे पालन न केल्यास त्याविरूद्ध न्यायालयात दाद मागता येत नाही. मात्र,घटनेने त्यांना 'देशाच्या प्रशासनात अत्यंत मूलभूत असल्याचे' घोषित केले आहे.

### १०) मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties)

मूळ घटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश नव्हता. नंतर स्वर्ण सिंह समितीच्या शिफारसीनुसार ४२ व्या घटनादुरुस्ती (१९७६) अन्वये घटनेत भाग IV-A समाविष्ट करण्यात आला, ज्यामंध्ये ५१A हे एकच कलम टाकण्यात आले. त्यामध्ये

१० मूलभूत कर्तव्यांची यादी समाविष्ट करण्यात आली. नंतर ८६ व्या घटनादुरूस्तीने (२००२) ११ वे कर्तव्य टाकण्यात आले. मूलभूत कर्तव्ये न्यायप्रविष्ट नसली तरी ती नागरिकांना जाणीव करून देतात की, हक्कांचा उपभोग घेत असतांना देशाप्रती,समाजाप्रती व इतर नागरिकांप्रती आपली काही कर्तव्येही आहेत.

### ११) आणीबाणीविषयक तरतुदी (Emergency provisions)

• घटनाकर्त्यांनी शासन कारभार चालविणे अवघड बनण्याच्या स्थितीची कल्पना करून अशा आपत्कालिन परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणीबाणीची तरतूद केली आहे. अशी आपत्कालिन परिस्थिती देशाचे सार्वभौमत्व, एकता, अखंडता आणि सुरक्षेस धोका निर्माण करणारी असू शकते. त्यामुळे अशा स्थितीमध्ये देशाची राजकीय लोकशाही व्यवस्था व घटना यांचे संरक्षण करता यावे, यासाठी आणीबाणीबद्दलच्या तरतुदी घटनेत करण्यात आल्या आहेत.

• घटनेत तीन प्रकारच्या आणीबाणींची तरतूद आहेः

i) राष्ट्रीय आणीबाणी: युद्ध, परकीय आक्रमण किंवा सशस्त्र उठाव या कारणांवरून (कलम ३५२)

ii) घटकराज्यातील आणीबाणी/राष्ट्रपती राजवट: राज्यातील घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास (कलम ३५६) किंवा केंद्राचे निर्देश पाळण्यास राज्य अपयशी ठरल्यास (कलम ३६५)

iii)वित्तीय आणीबाणी: भारताच्या वित्तीय स्थैर्यास किंवा पतपात्रतेस धोका निर्माण झाल्यास (कलम ३६०)

आणीबाणीच्या काळात भारतातील संघराज्यीय व्यवस्था एकात्मक व्यवस्थेत परावर्तीत होते, कारण घटकराज्यांचे अधिकार नष्ट होऊन ते केंद्र सरकारच्या हातात एकवटतात. हे भारताच्या घटनेचे एक अद्वितीय वैशिष्ट्य आहे.

### १२) एकेरी नागरिकत्व

नागरिकांना संपूर्ण देशात (काही आदिवासी प्रदेश वगळता) समान नागरी व राजकीय अधिकार प्राप्त होतात. देशातील प्रादेशिक भिन्नता कमी करून सर्व नागरिकांमध्ये राष्ट्रवादाची भावना वाढीस लावणे, हा एकेरी नागरिकत्वामागील उद्देश आहे.

### १३) सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धत (Universal Adult Franchise)

भारताची लोकशाही 'एक व्यक्ती एक मत' या तत्वावर कार्य करते. घटनेतील कलम ३२६ मध्ये सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या व्यवस्थेची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार, १८ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या सर्व प्रौढ व्यक्तींना जात, वंश, धर्म, लिंग, साक्षरता, संपत्ती इत्यादींचा विचार न करता लोकसभा व

विधानसभांच्या निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क देण्यात आला आहे. (मतदानाचे किमान वय ६१वा घटनादुरूस्ती कायदा,१९८८ अन्वये २१ हून १८ वर्षे असे कमी करण्यात आले.)

भारताची घटना सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या पद्धतीद्वारे भारतात राजकीय समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते.

### १४) धर्मनिरपेक्ष राज्य (A Secular State)

भारताच्या घटनेने धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती केली आहे. जरी 'धर्मनिरपेक्ष' या शब्दाचा उल्लेख घटनेत प्रास्ताविकेव्यतिरिक्त इतरत्र कोठेही नाही तरी घटनेच्या विविध तरतुदींवरून भारतीय राज्याचे धर्मनिरपेक्ष स्वरूप स्पष्ट होते. पाश्चिमात्य देशांतील धर्मनिरपेक्षतेची नकारात्मक संकल्पना (चर्च व राजकारण परस्परांपासून विभक्त असणे) भारतासारख्या बहुधार्मिक देशात लागू करणे अवघड आहे. त्यामुळे, भारताच्या घटनेत धर्मनिरपेक्षतेच्या सकारात्मक संकल्पनेचा स्विकार करण्यात आला आहे. त्यानुसार, भारताचा कोणताही राज्यधर्म नाही, मात्र राज्यसंस्थेमार्फत सर्व धर्मांना समान वर्तणूक दिली जाते.

---